# राजमाता विजयाराजे शिंदे : एक शिवशक्ती

**साहित्य, ललित कला, क्रीडा, राजकारण आणि समाजसेवा यांपैकी एखाद्या क्षेत्रात राष्ट्रीय पातळीवर असामान्य यश संपादन करणाऱ्या कर्तबगार महिलेस कोल्हापूरच्या ताराराणी विद्यापीठातर्फे प्रतिवर्षी 'भद्रकाली ताराराणी' पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. यंदाचा पहिला पुरस्कार भारतीय जनता पक्षाच्या उपाध्यक्षा श्रीमती विजयाराजे शिंदे यांना आज समारंभपूर्वक देण्यात येत आहे. त्यानिमित्त त्यांना देण्यात यावयाचे हे मानपत्र**



राजमाता विजयाराजे शिंदे

**आ**दरणीय राजमाताजी,

समशेरीच्या सामर्थ्याने अथवा हिंदुस्थान दीपवून टाकणाऱ्या वीर शिरोमणी महादजी शिंदे ऊर्फ पाटीलबाबा यांच्या ख्यातकीर्त कुलातील नामवंत महिला म्हणून आपणाविषयी आम्हाला आदर वाटतो. शिक्षणासाठी व संस्कारासाठी आदर्शाचा शोध घेणाऱ्या या ताराराणी विद्यापीठास तर आपला विशेष अभिमान वाटतो. कारण आपण आमच्या स्वनामधन्य महाराष्ट्राच्या स्नुषा आहात. आपल्या चरित्रात व चारित्र्यात आधुनिक हिंदू स्त्रीच्या गुणांचा परमोत्कर्ष झालेला आहे.

मध्य प्रांतातील ठाकूर महेंद्रसिंग या उपजिल्हाधिकाऱ्यांच्या पोटी आपला १९१९ ला जन्म झाला असला तरी आपले लालनपालन बाल्यावस्थेत व युवावस्थेत आपले मातामह खड्गसमशेर जंगबहादूर राणा व त्यांच्या पत्नी यांनी केले. आपले ते मातामह खरे तर नेपाळचे राजेच व्हायचे, पण दैवदुर्विलास असा, की त्यांना नेपाळ सोडून परागंदा व्हावे लागले. हेच पुढे मध्य प्रांतात 'सागर' या ठिकाणी 'नेपाळ पॅलेस' नावाची भव्य इमारत बांधून स्थायिक झाले. त्यांच्या या राजप्रासादातच 'लेखा दिव्येश्वरी' हे पंडितांनी कुंडलीवरून दिलेले नाव मिरवीत, आपण आपले बाल्य उपभोगिले. या नेपाळ पॅलेसमध्ये आपली आजी, आपले कुटुंबीय यांनी दिलेले हिंदू राजपूत संस्कार आपल्या मनात रुजले. दैवभक्ती व प्रार्थना यासंबंधीच्या कल्पना आपल्या मनात जागृत झाल्या.

श्रीमंत राजकुलात वावरत असूनही त्या जुन्या काळात आपण इंटरची परीक्षा पास झालात. बी.ए. होण्याच्या अगोदरच म्हणजे १९४१ साली आपण जयाजीराजे शिंदे यांच्या अर्धांगिनी म्हणून शिंद्यांच्या राजकुलात प्रविष्ट झालात, हा एक अपूर्व योग होता. महाराज जयाजीराव शिंदे हे एक प्रजावत्सल, कर्तबगार आणि रसिक राजपुरुष होते. महाराज व आपण स्वतः प्रजेत मुक्तपणे मिसळत होता. आपण प्रजेचे 'मायबाप' होता. जयाजीरावांच्या कारकीर्दीत आपल्या प्रासादात लक्ष्मी आणि सरस्वती एकत्र नांदत होत्या. आपल्या सुखी संसारात आपल्याला चार कन्या व एक पुत्र अशा अपत्यांचा लाभ झाला. परंतु दुर्दैवाने १९६० साली महाराजांचे निधन झाले.

या दैवी आघाताने खचून न जाता आपण दुःख गिळून उभ्या राहिलात. राजकुटुंबातील कर्त्या स्त्रीची भूमिका आपण मोठ्या हिमतीने पार पाडली. या काळात आपण सागर विद्यापीठाच्या कुलपती झालात. आपली ही निवड एकमताने झाली होती व आपण ही निवड आपल्या कर्तबगारीने सार्थ ठरविली. १९६२ साली लोकाग्रहास्तव आपण 'गुणा' मतदारसंघातून लोकसभेची निवडणूक लढविली आणि प्रचंड बहुमताने निवडून आलात. आपल्या प्रिय पतीच्या निधनाने एकाकी झालेले आपले मन आपण समष्टीच्या सेवेत जणू विसर्जित केले. तेथपासून आपले समाजसेवेचे असिधाराव्रत अखंडपणे चाललेच आहे. भारतातील महत्त्वाचे राजकीय व्यक्तिमत्त्व म्हणून आपणाकडे पाहिले जाते. अनेक देशी आणि परदेशी नेत्यांची भेट आपणास घ्यावी लागते. आपणाकडे पाहताना भारतीय संस्कृतीचाच मूर्तिमंत परिचय या नेत्यांना घडत असतो.

१९७५ साली आणीबाणी घोषित झाली. जनतेच्या मूलभूत अधिकारांचा संकोच झाला. त्यावेळी या अधिकारांचे रक्षण करण्यासाठी आपण निर्भयपणे पुढे झालात. आपल्याला तुरुंगवास भोगावा लागला. कल्पनातीत शारीरिक आणि मानसिक यातना आपल्यास सहन कराव्या लागल्या. पण सामान्य जनतेच्या प्रतिनिधी म्हणून आपण या सर्व यातना सहन केल्या व जनतेला पुन्हा एकवार स्वातंत्र्य मिळवून दिले.

सध्याही आपण खासदार आहात व भारतीय जनता पक्षाच्या उपाध्यक्षाही आहात. पक्षाच्या व इतर कामासाठी भारतभर आपले अखंड परिभ्रमण चालू असते. शिवाय विश्व हिंदू परिषदेचीही बहुतांशी जबाबदारी आपण आपल्या शिरावर घेतली आहे. शांत आणि वत्सल, जिद्दी आणि करारी, निर्भय आणि अभिमानी अशी भारतीय स्त्रीची अनेक रुपे आपल्या व्यक्तिमत्त्वात एकवटली आहेत.

अखिल भारतीय स्तरावर साहित्य, ललित कला, क्रीडा, राजकारण आणि समाजसेवा यांपैकी एखाद्या क्षेत्रांत असामान्य यश संपादन करणाऱ्या कर्तबगार महिलेला हा 'भद्रकाली ताराराणी' पुरस्कार देऊन सन्मानित करावे, अशी आमची इच्छा होती. आरदणीय राजमाताजी, विद्यमान भारतात या पुरस्कारास योग्य अशी गुणाढ्य महिला आपणाखेरीज अन्य कोणीही नाही. 'वज्रादपि कठोराणि, मृदुनि कुसुमादपि' असेच आपले अंतःकरण आहे. सामान्य जनतेच्या सुखासाठी, राजवाड्यातील फुलांच्या पायघड्या लाथाडून आपण दीनदुबळ्यांच्या काटेरी पायवाटेवरून चालण्याचे व्रत पत्करले आहे. शिंद्यांच्या दरबारातील सुखाचा शीतल वारा टाकून आपण गरिबांसाठी उन्हा-पावसात आला आहात. आम्ही आपल्याला कृतज्ञतापूर्वक अभिवादन करतो.

मराठेशाहीचा अस्त होऊ घातला असता, ज्या युगस्त्रीने आलमगिरासारख्या मातब्बर शत्रूशी झुंज घेऊन मराठ्यांचे भगवे निशाण फडकत ठेवले, हिंदवी स्वातंत्र्य व अस्मिता अबाधित ठेवली, त्या रणरागिणी स्वातंत्र्य सौदामिनी ताराराणींचे नामाभिधान या पारितोषिकाला दिले आहे. माताजी, 'भद्रकाली ताराराणी' या नावाने अभिमंत्रित झालेल्या या पारितोषिकाचा स्वीकार करू शकेल, अशी आपणाशिवाय अन्य कोणी अष्टपैलू स्त्री आम्हाला आज भारतात दिसत नाही. म्हणून भद्रकाली ताराराणी पुरस्काराचा पहिला मान आपणास देऊन आम्ही या पारितोषिकाचाच सन्मान करीत आहोत.

माननीय डॉ. व्ही. टी. पाटील तथा 'काकाजी' यांनी गेले अर्धशतक निरिच्छ आणि निःस्पृह कर्मयोगाचे आचरण करून या ताराराणी विद्यापीठाचे जनन आणि संगोपन व संवर्धन केले आहे. त्यांच्या कल्पनेतील आदर्श स्त्रीचा पदस्पर्श आपल्या रुपाने या परिसरास झाला आहे, असे मानून त्यांच्या आशीर्वादासह हे मानपत्र आणि पहिला भद्रकाली ताराराणी पुरस्कार आपणास देऊन आम्ही धन्य होत आहोत. रुपये ११,००० ही या पुरस्काराची रक्कम प्रतीक मात्र आहे. आम्हाला आपणाविषयी वाटणारा स्नेह हा शब्दातीत आहे.